SJIF Impact Factor - 5.67

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Augest 2022 Special Issue 06 Volume II (B)

## Department of Humanities Organises One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse




- Executive Editor -

**Prof.Dr. A.D. Goswami**

Vice-Principal & Head Department of Business Economics

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Guest Editor -

**Dr. Mrs. Minakshi V. Waykole**

Principal,

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Associate Editor -

**Dr. Prafull Ingole**

Head Department of History

**Mr. S. K. Rathod**

Head of Department Psychology

**Dr. Manoj Patil**

Department of Hindi

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# *Akshara Multidisciplinary Research Journal*

**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**August 2022**

**Special Issue 06 Vol. II (B)**

Department of Humanaties Organises
One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse

**Executive Editor**
**Prof. Dr. A. D. Goswami,**
Vice - Principal & Head Dept. of Business Economics
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Guest Editor**
**Dr.Mrs . Minakshi V.Waykole**
Principal
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Associate Editors**

**Dr. Prafull Ingole**
Head Department of History

**Mr. S. K. Rathod**
Head Of Department Psychology

**Dr. Manoj Patil**
Department of Hindi

Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Organising Committee Members**

**Dr. S. V. Patil**
Vice-Prin.
**Dr.K.K.Ahire**
**Dr.P.A.Ahire**
**Prof.D.N.Patil**
**Prof.Purushottam Mahajan**
**Dr.Sachin Rajput**

**Prof. B. H. Barhate**
Vice-Prin.
**Dr.J.F.Patil**
**Prof.S.T.Dhum**
**Dr.R.S.Nadekar**
**Dr.Rajendra Tayade**
**Dr.Vitthal Kendre**
**Dr.Lalit Tayade**

**Mr. N. E. Bhangale**
Vice-Prin.
**Dr.S.P.Zanke**
**Prof.V.P.Ladhe**
**Dr.N.N.Zope**
**Dr.Dipak Shirsat**
**Mr. Jitendra Adokar**

*Akshara Publication*
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

## Editorial Board

### -: Chief & Executive Editor:-

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 09421682612
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

### -:Co-Editors :-

- **Dr. Sirojiddin Nurmatov,** Associate Professor, Tashkent Institute Of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan
- **Dr.Vivek Mani Tripathi,** *Assistant Professor*, Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China
- **Dr.Maxim Demchenko** Associate Professor Moscow State Linguistic University, Institute Of International Relationships, Moscow,Russia
- **Dr.Mohammed Abdraboo Ahmed Hasan,** Assistance Professor (English) The Republic of Yemen University of Abyan General manager of Educational affairs in University of Abyan ,Yemen.
- **Dr. Vijay Eknath Sonje,** *Assistant Professor* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh SamadhanGuruchal,** *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum,** *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.] India.
- **Mr. Dipak Santosh Pawar,** *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalya, Jalgaon [M. S.] India.

AMRJ

**AMRJ Disclaimer:**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# Index



| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg. No |
|---|---|---|---|
| 1 | भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. विजय मांटे | 09 |
| 2 | लोकसंख्या विस्फोट भारतासाठी एक समस्या | डॉ.किरण अमृत वारके | 14 |
| 3 | Jotriao Phule's Critique of British Colonial Rule in India | Dr. Liladhar Shivajirao Patil | 17 |
| 4 | नंदुरबार जिल्हयातील सहकार क्षेत्राची चळवळ : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.अरुण उखा पाटील | 20 |
| 5 | भारतीय स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाची भूमिका | अमोल श्रावण बावस्कर<br>प्रा.डॉ. ए.डी.गोस्वामी | 23 |
| 6 | विसाव्या शतकात महाराष्ट्रातील अंधश्रद्धा विषयक प्रबोधन कार्यात समाज सुधारकांचे योगदान | श्री भरत केवळ आहेर<br>प्रा.डॉ.संजय यशवंत गवळी | 26 |
| 7 | Kamala Das: A Woman's Voice in Post Independence Indian English Literature | Prof. Dr. Smita Sanjay Chaudhari | 30 |
| 8 | स्वातंत्र्य चळवळ आणि मराठी साहित्यानुबंध | डा. जितेंद्र शामसिंग गिरासे | 34 |
| 9 | आजादी के उपरान्त हिन्दी उपन्यासों में आदिवासी संघर्ष | डॉ. सविता काशिराम तायडे | 37 |
| 10 | स्वतंत्र भारत में मराठी संतों द्वारा हिंदी में प्रयुक्त विविध काव्य प्रकार | डॉ. मनोज नामदेव पाटील | 40 |
| 11 | आजादी के 75 वर्ष में बिरसा मुंडा का योगदान | प्रा. डॉ. पिरु गवली | 43 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान | दत्तात्रय पांडुरंग कातडे | 45 |
| 13 | महिलांच्या आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्त्व :- विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा | डॉ.दिनेश जेरमा गावीत | 52 |
| 14 | भारतीय स्वातंत्र्य लढा पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध आणि जळगाव जिल्हा | प्रा. डॉ. दीपक शिरसाट | 56 |
| 15 | संरचनात्मक बदलांची 75 वर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे | 65 |
| 16 | लोकसंख्येचा विस्फोट | डॉ. संजय वसंत भामरे | 70 |
| 17 | भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांची भूमिका | डॉ. शकुंतला एम. भारंबे | 75 |
| 18 | भारतीय शेती : अन्नधान्याची स्वयंपूर्णता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर | प्रा.डॉ.विनोद झामा मोरे | 80 |
| 19 | स्वातंत्र्योत्तर काल के प्रवासी साहित्य में भारतीय दृष्टि | प्रा. डॉ. जगदीश बी. चव्हाण | 85 |
| 20 | भीष्म साहनी के उपन्यासों में चित्रित राजनैतिक पक्ष | प्रा. डॉ. कृष्णा प्रल्हाद पाटील | 88 |
| 21 | स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेतील सामाजिक जाणीवा | डॉ. रामलाल चौधरी | 93 |





Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67


| | | | |
|---|---|---|---|
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय एकात्मता | प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे) | 97 |
| 23 | Depiction of Indian Freedom Struggle in Raja Rao's Kanthapura | Dr. Vitthal Ranba Kendre | 101 |
| 24 | स्वातंत्र्य पूर्व काळातील आणि उत्तर काळातील भारतीय शेती | प्रा.डॉ.वैशाली भिवसेन भिसे | 105 |
| 25 | भारतीय राजकारणासमोरील प्रमुख आव्हाने : एक अभ्यास | प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे | 107 |
| 26 | Study of Corporate Social Responsibility in India | Amar Vasant Jawale | 110 |
| 27 | Depiction of the State of Women by Indian Women Writers in English | Dr. Hemangini M. Patil | 114 |
| 28 | Indian Women Novelists in English in Post-Inpendence Era | Dr. Jyoti L Dharmadhikari | 118 |
| 29 | भारताचा नियोजन कालीन विकास | डॉ.सचिन भास्कर कुंभार | 122 |
| 30 | Prominent Themes in The Literary Work of Post Colonial Indian English Women Writers | Kaustubh Pravin Patil<br>Kalyani Shivdayal Pande | 127 |
| 31 | Perspectives on "Punishment" in Gandhian Philosophy | Monalisa Saikia | 130 |
| 32 | भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाची ७५ वर्षे | निलेश रविंद्र कोळी<br>प्रा.डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड | 133 |
| 33 | लोकसंख्या विस्फोटाची कारणे व उपाययोजना: दृष्टीक्षेपात भारत | प्रा.डॉ. ललित निवृत्ती तायडे | 138 |
| 34 | Impact of Gandhian Thoughts in Raja Rao's Novel 'Kanthapura' with Special Reference to Indian Freedom Struggle | Prof.Yogeshwar D. Patil | 143 |
| 35 | भारतातील तृतीयपंथीयांचे शिक्षण: स्थिती आणि आव्हाने | प्रा. त्रिशिला जाधव साळवे<br>प्रा. डॉ.सुनील पराशराम पाटील | 147 |
| 36 | स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि उत्तर काळातील भारतीय शेती | श्रीमती नीता अरुण पाटील | 152 |




Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

29

# भारताचा नियोजन कालीन विकास

डॉ.सचिन भास्कर कुंभार
अर्थशास्त्र विभाग
डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,जळगाव

प्रस्तावना :

जगाच्या पाटीवर भारत हा बलाढ्य व मजबूत लोकशाहीचे अधिकार अनुभवणारा अद्वितीय देश आहे . भारतात जवळपास 2.5 लाख पंचायती 3842 नागरी स्वराज्यसंस्था व त्यामधील कार्यरत जनतेचे प्रतिनिधी अशी अमर्याद शक्ती आहे . या लोकशाहीच्या जोरावर विकासाच्या अनेक संधी उपलब्ध व साध्य होऊ शकतात . या साठी सर्वस्तरीय नियोजनाची आवश्यकता असते . भारतात आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक नियोजन आखण्यात आले . नियोजन प्रक्रियेची सुरुवात 1951 रोजी नियोजन आयोगाच्या स्थापनेतून झाली . नियोजन हे नियोजित अर्थव्यवस्थेचे अविभाज्य अंग असून त्यामध्ये देशातील स्त्रोतांचा सुयोग्य व कार्यक्षम वापर करून वाढ व विकास करणे अभिप्रेत आहे . अर्थव्यवस्थेत उत्पादन , गुंतवणूक व फलनिष्पत्ती यांचा आराखडा बनविण्यासाठी प्रभावी व सशक्त आर्थिक नियोजन व्यवस्था कार्यरत असावी लागते . या गरजेतूनच 15 मार्च 1950 रोजी राष्ट्रीय स्तरावर नियोजनाची आखणी करणारी घटनाबाह्य यंत्रणा म्हणून नियोजन आयोग कार्यरत झाला . देशातील संसाधने , भांडवल आणि भौतिक व मानवी साधन सामाग्रीचा यांचा कार्यक्षम वापर करता येईल . अशी योजना आखणे हे नियोजनाचे मुख्य कार्य होते . या दृष्टीने देशात विकास योजना आराखड्याची आखणी व मूल्यमापन याबाबत नियोजन आयोगाची भूमिका महत्वपुर्ण टरली आहे . उत्पादन कसे व्हावे या अर्थव्यवस्थेतील बाजारपेठेच्या वाढत्या सहभागाबरोबरच सरकारची भूमिका नियामक बनविण्यात नियोजन आयोग सहाय्यक ठरला आहे. देशाच्या वाढत्या आर्थिक वृध्दीदरा बरोबर सरकारचा निधीही वाढत जाऊ लागला. त्यातूनच विकासा बद्दलची अपेक्षाही बदलली कल्याणकारी शासनाकडून सामाजिक - आर्थिक विकासाची अपेक्षा आता हक्कात होऊ लागली. याबरोबरच सरकारची भूमिका ही आता कल्याणकारी न राहता प्रत्येक नागरिकाच्या उत्तरदायित्वाच्या मांडणीची बनली. यासाठी सर्वसमावेशक विकासाकरीता आपल्या कार्यव्यवस्थेत बदल घडून आणण्याची गरज पुढे आली. नियोजन आयोग निती आयोगाच्या रुपात समोर आल्याने आशा निर्माण झाली व याद्वारे केंद्र राज्य संबंधाचा विधायक मार्गाने सुरु झालेला प्रवास संवाद व समन्वयाच्या माध्यमाने परस्परपुरक झाला. सर्वांना एकत्र घेऊन विकासाची रचना याद्वारे बदलेल. तसेच केंद्र पुरस्कृत योजना जर राज्यात यशस्वी ठरली तर ती देशभर नेण्याचा नीती आयोग हा महत्वाचा मार्ग ठरु शकेल . सर्वसमावेशक विकासाच्या आणि सहभागी लोकशाहीच्या दिशेने बदल घडवून आणण्याची मोठी जबाबदारी नीती आयोगाला पेलावी लागणार आहे. या शोध निबंधात संशोधक नियोजनाचा इतिहास आणि 1951 पासून सुरु झालेल्या पंचवार्षिक योजनांचा भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाचा आढावा घेतला आहे.

**उद्दिष्ट्ये** : -भारताचा नियोजन काळातील विविध घटनांचा अभ्यास करणे.

**गृहीतक** : - भारताचा नियोजन काळात आर्थिक विकास झालेला आहे.

**संशोधन पद्धती** :- संशोधकाने संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

"पंचवार्षिक योजनेची पार्श्वभूमी : भारत स्वतंत्र झाला तेव्हा त्याची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची होती. अत्यंत कमी कृषी उत्पादन, औद्योगिक क्षेत्राचा अल्प विकास आणि फाळणी मुळे निर्माण झालेली सुरक्षेची समस्या या पार्श्वभूमीवर भारताने आर्थिक विकासाचा कोणता मार्ग अवलंबवावा यावर स्वातंत्र्याच्या आधीपासून चर्चा-विनिमय घडत होते. भांडवली अर्थव्यवस्थेत झालेल्या प्रचंड हानीमुळे आणि देशातील नेत्यांवर असलेल्या समाजवादाच्या प्रभावामुळे भारताने नियोजन पूर्वक विकासाचा मार्ग अवलंबला. नियोजन मंडळ – १५ मार्च 1950 मध्ये तत्कालीन सरकारच्या अधिनियमाने नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. पंचवार्षिक योजना या राष्ट्र पातळीवर, राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर नियोजनाचे काम चलतात, तसेच देशातील संसाधनाचा आढावा घेणे, नियोजन ठरवणे, संसाधनाचे वितरण, योजनांची अंबलबजावणी करणे, पुनर्नियोजन करणे, नियोजनाचे विविध टप्पे ठरविणे, देशाच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गातील अडथळे सरकारच्या सूचित करणे, योजनेचे वेलोवेळी परीक्षण करून त्यात योग्य ते बदल सुचविणे, या पद्धतीने नियोजन आयोग कार्य करते.



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

**भारताचा नियोजन कालीन विकास हा पुढील पंचवार्षिक योजनांमार्फत केलेला आहे.**

**पहिली पंचवार्षिक योजना –**

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1951 ते 31 मार्च 1956 असा ठेवण्यात आला होता. या कालखंडात राष्ट्रीय उत्पन्नात 2.1 % वार्षिक वाढ (NNP आधारित), कृषी क्षेत्राचा विकास (31% खर्च कृषी व सिंचन क्षेत्रावर), अर्थव्यवस्थेतील चलनवाढ आटोक्यात आणणे, 1955-56 अखेर अन्नधान्य उत्पादन 61.6 मा.टन करणे उद्दिष्टे असे ठेवण्यात आले होते आणि या योजनेचे साध्य हे राष्ट्रीय उत्पन्न 3.6 % (वार्षिक वृद्धीदर), चलनवाढीचा दर कमी झाला, अन्नधान्य उत्पादन 66.9 मा.टन, संथ औद्योगिक वाढ झालेली दिसून येते.

**पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** – आंध्र राज्याची निर्मिती (1953), युजीसी ची स्थापना (1953), पहिली IIT खरगपूर येथे स्थापन (1951), समुदाय विकास कार्यक्रम (1952), राष्ट्रीय विस्तार योजना (1953), दामोदर खोरे विकास प्रकल्प – टेनेसी खोरे प्रकल्पाच्या धर्तीवर, भाक्रा – नांगल धरण – सतलज नदीवर (1955), हिराकूड धरण – महानदी वर, स्टेट बँक ऑफ इंडिया ची स्थापना (1955), ICICI ची स्थापना (1955), सिंद्री खत कारखाना (झारखंड) (1951) इ. विकासात्मक घटक या नियोजनाच्या काळात झाल्याचे दिसून येतात.

**दुसरी पंचवार्षिक योजना –**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1956 ते 31 मार्च 1961 असा ठेवण्यात आला होता. या कालखंडाचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धी दर 4.5% ठेवणे आणि सोबतच देशांतर्गत वाहतूक व दळणवळण सर्वाधिक खर्च करणे असे ठेऊन नियोजनाचे साध्य हे 4.2% वार्षिक वृद्धीदर, मोठ्या प्रमाणात चलनवाढ, अन्नधान्य उत्पादन 82 मा.टन आणि मध्यम औद्योगिक वाढ झाली. **दुसरी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** महाराष्ट्र राज्य निर्मिती, दुसरे औद्योगिक धोरण(समाजवादी समाजरचना) 1956, BHEL ची निर्मिती, नांगल आणि रुरकेला खत कारखाना -1961, भिलाई लोह पोलाद उद्योग (रशिया च्या मदतीने), रुरकेला लोह पोलाद उद्योग (जर्मनी च्या मदतीने), दुर्गापूर लोह पोलाद उद्योग (ब्रिटन च्या मदतीने), आयआयटी कायदा – 1956, एलआयसी ची स्थापना (1956), बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ची स्थापना (1957) इ. विकासात्मक घटक या नियोजनाच्या काळात झाल्याचे दिसून येते.

**तिसरी पंचवार्षिक योजना-**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1961 ते 31 मार्च 1966 असा होता यात उद्दिष्टे ही 5.6% वार्षिक वृद्धीदर ठेवणे असा होता, या योजनेचे साध्य म्हणजे 2.8% वार्षिक वृद्धीदर कमी झाला, देशात चलनवाढ झाली आणि अन्नधान्य उत्पादन घटले. **तिसरी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** – भारत-चीन आणि भारत-पाकिस्तान युद्ध, गोवा मुक्तिसंग्राम (1961), नागालँड ची स्थापना (1963), कृषी किंमत आयोगाची स्थापना (1965 – प्रो.दांतवाला), भारतीय अन्न महामंडळ ची स्थापना (1964), आयडीबीआय आणि युटीआय ची स्थापना (1964) इ. बदल या नियोजन काळात झालेत.

**तीन वार्षिक योजना (स्वावलंबन योजना)**

तीन वार्षिक योजना नियोजन मंडळाने घेऊन त्याचा कालखंड 1 एप्रिल 1966 ते 31 मार्च 1969 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा 5% वार्षिक वृद्धीदर आणि दुष्काळ व युद्धातून सावरणे असे होते तर या नियोजन काळात साध्य ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 3.9%, चलनवाढ वाढदर आधी वाढला आणि नंतर उतरला, अन्नधान्य उत्पादन 94 मा.टन असे होते. याच काळात घडलेल्या काही महत्त्वाच्या घडामोडी - रुपयाचे अवमूल्यन (1966), पंजाब-हरियाणा ची निर्मिती (1966), हरितक्रांती ची सुरुवात, तांदूळ, गहू, मका, ज्वारी, बाजरी इ. पिकांसाठी - HYVP कार्यक्रम (1966-67)

**चौथी पंचवार्षिक योजना –**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1969 ते 31 मार्च 1974 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा 5.7% वार्षिक वृद्धीदर (NDP आधारित)ठेवणे, सर्वाधिक खर्च कृषी व सिंचन आणि त्यानंतर उद्योग आणि वाहतूक दळणवळण, संपत्ती व आर्थिक विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक विकासावर भर, शिक्षण व मनुष्यबळ विकासावर भर इ. ठेऊन, याच नियोजन काळात वार्षिक वृद्धीदर – 3.3% (10 व्या पंचवार्षिक योजने नुसार 2.05%), अन्नधान्य उत्पादन 104.7 मा.टन इ. घटक साध्य झालेले दिसून येतात. **चौथी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** म्हणजे पाहिले शिक्षण धोरण (1968), भारत-पाकिस्तान युद्ध (1971), MRTP (1969) & FERA ACT(1973), अनुकूल व्यापार तोल (1972-73), बोकारो लोह पोलाद उद्योग (रशियाच्या मदतीने), SAIL ची निर्मिती (1973), ऑपरेशन फ्लड (1970), अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम (1973-74),



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

बँकांचे राष्ट्रीयीकरण (1969), अग्रणी बँक योजना (1969) इ. घटकान द्वारे देशाच्या विकासास पोषक वातावर निर्मिती केलेली दिसून येते.

**पाचवी पंचवार्षिक योजना-**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1973 ते 31 मार्च 1978 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा 4.4% वार्षिक वृद्धीदर(GDP आधारित), गरिबी हटाओ असे ठेवण्यात आले. या सोबतच या नियोजन काळाचे साध्य हे देशात वार्षिक वृद्धीदर 4.8%, भरमसाठ चलनवाढ (25%) झाली, अन्नधान्य उत्पादन 126 मा.टन इतके झाले. **पाचवी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** - पोखरण चाचणी (1974), सिक्कीम ला राज्याचा दर्जा, 42 वी घटना दुरुस्ती आणि आणीबाणी ची सुरुवात, अनुकूल व्यापरतोल (1976-77), पाहिले राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (1976), TRYSEM, ICDS आणि DDP या योजना सुरू झाल्या, RRB ची स्थापना (1975), HDFC ची स्थापना (1977) झाली.

**सरकती योजना – जनता दलची योजना**

कालखंड 1 एप्रिल 1978 ते जानेवारी 1980 असा होता आणि या काळात जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना (1978), कामासाठी अन्न योजना (1979) या योजना कार्यन्वित झाल्या.

**सहावी पंचवार्षिक योजना -**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1980 ते 31 मार्च 1985असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 5.2%, सार्वजनिक खर्च हा ऊर्जा, कृषी व सिंचन, उद्योग करणे आणि दारिद्र्य निर्मूलन करणे. या नियोजनेचे साध्य हे वार्षिक वृद्धीदर 5.7%, अन्नधान्य उत्पादन – 145 मा.टन झाले, चलनवाढ आटोक्यात आली, औद्योगिक वृद्धीदर कमी झालाचे दिसते. **सहावी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** - भोपाळ गॅस दुर्घटना (1984),एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (1980), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना (1980), ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालकांसाठी विकास योजना(1982), बँकांचे राष्ट्रीयीकरण (1980), नाबार्ड ची स्थापना (1982) इ. महत्वाची घटना झाल्यात ज्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचा आहेत.

**सातवी पंचवार्षिक योजना-**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1985 ते 31 मार्च 1990 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 5%, सार्वजनिक खर्च हा ऊर्जा, कृषी व सिंचन, सामाजिक सेवा इ. करण्याचे ठरवले आणि योजनेने साध्य हे देशाचा वार्षिक वृद्धीदर 6%, अन्नधान्याचे उत्पादन 171 मा.टन झाले, **सातवी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** इंदिरा आवास योजना (1985), ग्रामीण क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यासाठी CAPART ची स्थापना (1986), जवाहर रोजगार योजना (1989), नेहरू रोजगार योजना (1989), दुसरे शिक्षण धोरण (1986), खडू फळा मोहीम (1987), राष्ट्रीय गृह बँकेची स्थापना (1988) इ. रोजगार भिमुख योजना सुरु झाल्या.

**वार्षिक योजना - स्वावलंबन योजना**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1990 ते 31 मार्च 1991 आणि 1 एप्रिल 1991 ते 31 मार्च 1992 असा होता, या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी एलपीजी मॉडेल स्वीकारले आणि नवीन औद्योगिक धोरण, हर्षद मेहता घोटाळा (1991), सेबी ची स्थापना (1992), रुपयाचे अवमूल्यन, रुपया चालू खात्यावर अर्ध-परिवर्तनीय असे बदल देशात झालेत.

**आठवी पंचवार्षिक योजना -**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1992 ते 31 मार्च 1997 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 5.6%, मानवी विकासाला सर्वाधिक प्राधान्य आणि सार्वजनिक खर्च हा ऊर्जा, सामाजिक सेवा, कृषी व सिंचन इ. करून या आठव्या योजनेने देशाचा वार्षिक वृद्धीदर 6.7%, संरचनात्मक समायोजन सुधारणा साध्य केले. **आठवी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** 73 वी आणि 74 वी घटनादुरुस्ती (1993), रुपया चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय, खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम(1993), मध्यान्ह आहार योजना(1995), गंगा कल्याण कार्यक्रम (1997) इ. विकासात्मक योजना सुऊ झाल्यात.

**नववी पंचवार्षिक योजना -**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 1997 ते 31 मार्च 2002 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 6.5% आणि देशात सार्वजनिक खर्च हा उद्योग, ऊर्जा, सामाजिक सेवा इ. केला. या नव्या योजनेने देशाचा वार्षिक वृद्धीदर 5.5%,



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

चलनवाढ कमी झाली आणि अन्नधान्य उत्पादन २१२ मा.टन. इ. साध्य झाले. **नववी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** - पोखरण अणू चाचणी II (1998), कारगिल युद्ध (1999), FEMA कायदा (2000), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (1997), स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना (1999), पंतप्रधान ग्रामोदय योजना (2000-01) – आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, विद्युतीकरण, पेयजल, पोषण यावर भर देऊन मानवी विकास, सर्व शिक्षा अभियान (2000-01), संपूर्ण स्वच्छता अभियान (1999) इ. योजनांची सुरुवात झाली.

**दहावी पंचवार्षिक योजना-**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 2002 ते 31 मार्च 2007 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 7.9%, कृषी क्षेत्र- अर्थव्यवस्थेचे प्रेरक बळ आणि गाभा क्षेत्र, सामाजिक, आर्थिक व लैंगिक सबलीकरण, राज्यांना विकासाचे मोजता येणारे लक्ष्य, 50 दशलक्ष रोजगारनिर्मिती, औद्योगिक उत्पादन 10% वृद्धीदर आणि सार्वजनिक खर्च हा सामाजिक सेवा, ऊर्जा, वाहतूक दळणवळण इ. घटकांवर केला आणि साध्य हे वार्षिक वृद्धीदर 7.7%, औद्योगिक वृद्धीदर 8.2% इतके झाले तसेच **दहावी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** राष्ट्रीय कामाच्या बदल्यात अन्न योजना(2004), भारत-अमेरिका नागरी अणू करार (2005), भारत निर्माण योजना (2005) गृहनिर्माण, सिंचन, पेयजल, रस्ते, विद्युतीकरण, दूरसंचार यांवर भर, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान योजना (2005), FRBM कायदा (2004), जननी सुरक्षा योजना (2005), एनआरएचएम (2005) इ. योजनांची सुरुवात झाली.

**अकरावी पंचवार्षिक योजना -**

या योजनेचा कालखंड एप्रिल 2007 ते 31 मार्च 2012 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा वार्षिक वृद्धीदर 9%, दरडोई जीडीपी वृद्धीदर 7.6%, दारिद्र्य 10% ने कमी करणे, सुशिक्षित बेरोजगारी 5% च्या खाली आणणे, विद्यार्थ्यांची गळतीप्रमाण 20% वर आणणे, साक्षरता 85% करणे, उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 15% करणे, शिशु मृत्यदर 28 व माता मृत्यदर 100 पर्यंत कमी करणे, एकूण जननदर 2.1 आणणे, 2009 पर्यंत सर्वांना स्वच्छ पाणीपुरवठा, 2009 पर्यंत सर्व खेडी व दारिद्र्य रेषेखालील लोकांना विजजोडणी करून देणे, 2012 पर्यंत सर्वांना ब्रॉडबँड सेवा पुरविणे, वने व आच्छादित क्षेत्रात 5% वाढ करणे, ऊर्जा कार्यक्षमता 20% ने वाढविणे, 2011 पर्यंत सर्व नद्या व शहरी घनकचरा व्यवस्थापन करून स्वच्छ करणे आणि सार्वजनिक खर्च हा ग्रामीण विकास , वाहतूक व ऊर्जा, शिक्षण इ. ठरवले आणि साध्य हे 92% खेड्यांना वीज, 70% बीपीएल लोकांना वीज, 69% भारतनिर्माण योजना पूर्ण, शिशू मृत्युदर 40%, मातामृत्यू दर 167, जननदर 2.3, साक्षरता 73%, वार्षिक वृद्धीदर 7.9% असे उद्दिष्ट ठरवले आणि **अकरावी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** जागतिक आर्थिक मंदी (2008). मुंबई हल्ला (2008). साक्षर भारत अभियान (2009), शिक्षण हक्क कायदा (2009), प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा कार्यक्रम (2010), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (2009), NAPCC ची सुरुवात (2008) इ. घटना देशात घडल्यात.

**बारावी पंचवार्षिक योजना-**

या योजनेचा कालखंड 1 एप्रिल 2012 ते 31 मार्च 2017 असा ठेवण्यात आला याचे उद्दिष्टे ही देशाचा जीडीपी वृद्धीदर 8.2%, कृषी वृद्धीदर 4%, उत्पादन वृद्धीदर 10%, दारिद्र्य 10% ने कमी करणे, 50 दशलक्ष रोजगार निर्मिती, सरासरी शैक्षणिक वर्षात 7 वर्षे वाढ, शैक्षणिक असमानता दूर करणे, माता मृत्युदर 1 , शिशु मृत्यूदर 25 व बाल लिंगगुणोत्तर 950 पर्यंत करणे, जननदर 2.1 आणणे, सिंचित क्षेत्राचे प्रमाण 103 दशलक्ष हेक्टर करणे, ग्रामीण टेलीडेन्सीटी 70% करणे, वायूउत्सर्जन 25% कमी करणे, वनच्छादित क्षेत्रात 1 दशलक्ष हेक्टर ची वाढ करणे, 30000 मेगावॅट पुनर्निर्मिती क्षम ऊर्जा तयार करणे आणि सार्वजनिक खर्च हा ग्रामीण विकास, शिक्षण, वाहतूक व ऊर्जा करण्याचे ठरवले आणि या योजनेतून वृद्धीदर 6.9%, शिशु मृत्युदर – 34 (2016), माता मृत्यूदर 130 (2016), जननदर 2.3 (2016) इ. साध्य केले. **बारावी पंचवार्षिक योजना काळात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी** NSDM आणि NSDA ची स्थापना, राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती कार्यक्रम (2013), राष्ट्रीय आरोग्य अभियान (2013) राष्ट्रीय कृषी विस्तार आणि तंत्रज्ञान अभिमान (2014), उन्नत भारत अभियान (2014), पढे भारत बढे भारत (2014) इ. भारताच्या विकासासाठी नियोजन आयोगा मार्फत पंचवार्षिक योजनेतून देशाचा विकास होतांना दिसून येतो.

**गृहीत कृत्याची पडताळणी –**

**गृहीतक** - भारताचा नियोजन काळात आर्थिक विकास झालेला आहे.

**स्पष्टीकरण –**



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

नियोजन काळातील वार्षिक वृद्धी दर

| अ.क्र. | पंचवार्षिक योजना | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|---|
| १. | पहिली योजना | २.१ % | ३.६% |
| २. | दुसरी योजना | ४.५% | ४.२% |
| ३. | तिसरी योजना | ५.६% | २.८% (भारताने – चीन,पाकीस्थान युध्ये) |
| ४. | चौथी योजना | ५.७% | ३.३% |
| ५. | पाचवी योजना | ४.४% | ४.८% |
| ६. | सहावी योजना | ५.२% | ५.७% |
| ७. | सातवी योजना | ५% | ६% |
| ८. | आठ योजना | ५.६% | ६.७% |
| ९. | नववी योजना | ६.५% | ५.५% |
| १०. | दहावी योजना | ७.९% | ७.७% |
| ११. | अकरावी योजना | ९% | ७.९% |
| १२. | बारावी योजना | ८.२% | ६.९% |

(स्त्रोत – भारतीय अर्थव्यवस्था – दत्त सुंदरम)

वरील सारणीत भारताचा वार्षिक वृद्धी दर हा नियोजन आयोगाने साध्य केलेला आहे.

भारताचा आर्थिक विकासात सहाय्यक ठरणारे पायाभूत क्षेत्रे, कृषी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्राचा, आर्थिक स्वावलंबन नियोजन आयोगा मार्फत १९५१ ते २०१७ पर्यंत सर्व पंचवार्षिक योजनांचा अभ्यास केल्यास देशाचा विकास साध्य केल्याचे दिसून येते. याच कालखंडात अनेक विकासास पोषक असे महत्वाच्या घडामोडी वर सांगितल्याप्रमाणे झाल्याने देशाचा सर्वांगीण विकास झालेचे स्पष्ट होते.

सर्वसमावेशक विकासाच्या आणि सहभागी लोकशाहीच्या दिशेने बदल घडवून आणण्याची मोठी जबाबदारी नीती आयोगाला पेलावी लागणार आहे, देशाच्या विकासाची धुरा आजपर्यंत नियोजनबध्दरित्या सांभाळणाऱ्या नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोग स्थापन झाला आहे.

**निष्कर्ष -**

१. भारताने नियोजन आयोगा मार्फत पहिला पंचवार्षिक योजनेत कृषी व सिंचन, वाहतूक व दळणवळण, सामाजिक सेवा इ. वर सार्वजनिक खर्च करून या क्षेत्रांचा विकास केलेला आहे.

२. नियोजन आयोगा मार्फत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत भौतिकतावादी योजनेला प्राधान्य देऊन विकास साध्य केला.

३. नियोजन आयोगा मार्फत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी व उद्योग या क्षेत्राचा विकासाचे लक्ष ठेवले.

४. चौथ्या पंचवार्षिक योजनेत स्थैर्यासह आर्थिक वाढ व आर्थिक स्वावलंबन अशा क्षेत्रांचा विकास साध्य केलेला दिसतो.

५. पाच, सहावी आणि सातव्या योजनेत दारिद्र्य निर्मूलन व स्वावलंबन, आत्मनिर्भरता, दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती जनक योजना अशा विकासात्मक योजना राबवल्या.

६. आठ,नऊ, दहा व्या पंचवार्षिक योजनेत मनुष्यबळ विकास योजना, शिक्षण योजना, गतिशील आणि सर्वसमावेशक विकास, सामाजिक न्याय व समानतेसह आर्थिक वाढ करू देशाचा विकास केल्याचे दिसून येते.

७. बाराव्या पंचवार्षिक योजनेत गतिशील, अधिक समावेशक आणि शाश्वत विकासाचे उद्दिष्ट्ये साध्य करून देशाचा विकास झालेला दिसून येतो.

**संदर्भ –**

१. भारतीय अर्थव्यवस्था – दत्त सुंदरम

२. भारतीय अर्थव्यवस्था – प्रो.डॉ.एन.एल. चव्हाण

३. https://www.adda.com/mr /five-year-plans-of-india-from-1951-to-2017/

४. https://www.doc.com/Economics/panchvarshik-yojana.php#Intro



Scanned by CamScanner